## वॉर रुमची भूमिका महत्त्वाची

ऑनलाईन परीक्षेमध्ये परीक्षा विभागाच्या वॉर रुमची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. ऑनलाईन परीक्षेला नोंदणी जे विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थित दिसत आहेत, त्यांच्या पीआरएन नंबरवरुन संपर्क साधून त्या विद्यार्थ्यांची अडचण समजून घेतली जात आहे. विद्यापीठाने शेवटच्या क्षणापर्यंत प्रत्येक विद्यार्थ्यांची माहिती अपडेट करुन घेतल्यामुळे शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे.

## ऑनलाईनला ९९ टक्के हजेरी

ऑनलाईन परीक्षेला विद्यार्थ्यांची ९९ टक्के हजेरी लागली आहे. गुरुवारी ३ सत्रामध्ये २३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. यामध्ये ४५ हजार विद्यार्थ्यांपैकी ४४ हजार १३३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. सोलापूर, मुंबई, औरंगाबाद विद्यापीठाच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देण्यात पुढे आहे.

## नातेवाईकाचा मृत्यू; टेरेसवरुन दिली परीक्षा

सांगली येथील एमबीएचा एक विद्यार्थी नातेवाईकाचे निधन झाल्यामुळे ऐन परीक्षेदरम्यान सोलापूरला गेला होता. शिवाजी विद्यापीठातील एमबीएचा तो एकच विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थित दिसत होता. मात्र परीक्षा विभागाने त्या विद्यार्थ्यांच्या पीआरएन नंबरद्वारे त्याची सर्व माहिती संकलित केली. संबंधित विद्यार्थ्याला संपर्क करुन त्याला परीक्षा देण्याची विनंती केली. यानंतर त्या विद्यार्थ्याने नातेवाईकांच्या घराच्या टेरेसवरुन मोबाईलवरुन परीक्षा दिली.



# ऑनलाईन परीक्षेत 'शिवाजी' द बॉस



- योग्य नियोजनामुळे शिवाजी विद्यापीठाची परीक्षा प्रक्रिया सुरळीत
- ४८ हजार विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा, परीक्षार्थींचे प्रमाण ९९ टक्के
- मुंबई, सोलापूर, औरंगाबादवर नियोजनाअभावी परीक्षा पुढे ढकलण्याची नामुष्की

**कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. मुंबई, पुणे, सोलापूर, औरंगाबाद येथील बड्या विद्यापीठांना तांत्रिक अडचणी, सायबर हल्ला, आणि नियोजनाचा अभाव यामुळे परीक्षा स्थगित करुन पुढे ढकलण्याची वेळ आली. मात्र शिवाजी विद्यापीठाने पहिल्याच प्रयत्नात ऑनलाईन परीक्षा सुरळीत व सुलभ पद्धतीने पार पाडत राज्यात दबदबा निर्माण केला आहे. तर मल्टीपल कोर्स, मल्टीपल लँग्वेज, मल्टीपल परीक्षा घेण्याचे आवाहनही विद्यापीठाने पेलले.**

आशिष आडीवरेकर
कोल्हापूर

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले. युजीसीच्या मार्गदर्शक तत्वानुसार शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे नियोजन विद्यापीठाच्या वतीने सुरु केले. कोल्हापूर जिल्ह्यातून २०० हून अधिक परीक्षांसाठी ७१ हजार ६६७ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. यात ४७ हजार ५६९ ऑनलाईन तर २४ हजार ९८ विद्यार्थी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देणार आहेत.

पुण्यातील एका खासगी कंपनीकडून हे सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आले आहे. आयआयटी मुंबईसह इतर विद्यापीठांमध्ये ऑनलाईन परीक्षेसाठी हे सॉफ्टवेअर वापरले जाते. कमी इंटरनेट कनेक्टीव्हीटीवर सुद्धा हे सॉफ्टवेअर तितक्याच ताकदीने काम करते. या सॉफ्टवेअरमध्ये विषयनिहाय प्रश्नपत्रिका तयार करणे, प्रश्नपत्रिका परीक्षेवेळी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे तसेच प्रश्नपत्रिका तपासण्याचे काम देखील या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. सॉफ्टवेअरच्या माध्यमातून पेपर तपासल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याला पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात मिळालेल्या गुणांची सरासरी काढून त्याचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. यामुळे यंदा निकालही लवकर व बिनचूक लागणार आहे.

### एकाचवेळी विविध भाषा, परीक्षा घेण्याचे आवाहन पेलले

शिवाजी विद्यापीठासमोर मल्टीपल कोर्स, मल्टीलपल लँग्वेज, मल्टीपल परीक्षा घेण्याचे आवाहन होते. सुमारे २०० परीक्षा अवघ्या १० दिवसांत घेण्याचे आवाहन होते. मराठी, इंग्लिशसह उर्दु, कन्नड, संस्कृत अशा विविध भाषेतील विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार होते. मात्र हे आवाहनही विद्यापीठाने पेलले.

### स्टेट बँकेत बसून पेपर

मंगळवेढा (सोलापूर) जिल्ह्यातील एका विद्यार्थ्याला इंटरनेटची अडचण होती. त्याला परीक्षा विभागामार्फत संपर्क साधला असता त्याने रेंजची अडचण असल्याचे सांगितले. यानंतर त्याला नजीक कोणती संस्था, महाविद्यालय, कार्यालय आहे काय अशी विचारणा करण्यात आली. त्याने समोर स्टेट बँकेची एक शाखा असल्याचे सांगितले. यानंतर विद्यापीठाच्या वतीने स्टेट बँकेत फोन करुन संबंधीत विद्यार्थ्यास सहकार्य करण्याची विनंती केली. यानंतर त्या विद्यार्थ्याने स्टेट बँकेत बसून पेपर दिला.

### शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन

अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षांना सुरुवात झाली आहे. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनानुसार परीक्षा विभागाने काटेकर नियोजन केल्यामुळे आतापर्यंतच्या परीक्षेमध्ये किरकोळ तांत्रिक त्रुटी वगळता सर्वच परीक्षा सुरळीत सुरु झाल्या आहेत. विद्यापीठाने शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन केले असून यासाठी हेल्परुम व परीक्षा विभागाची वॉर रुम कार्यान्वित करण्यात आली आहे.

**परीक्षा नियंत्रक डॉ. गजानन पळसे**

# अंतिम वर्ष परीक्षा सुरळीत पार पाडणार

## कुलगुरू डॉ. शिर्के; दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांच्यासमवेत शैक्षणिक विषयांवर चर्चा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना संकटाच्या काळात अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षा व्यवस्थितपणे पार पाडण्याचे आव्हान आहे. परीक्षांना प्रारंभ झाला असून तांत्रिक किंवा इतर अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरळीतपणे सुरू झाल्या आहेत. परीक्षा व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी निवडीनंतर शुक्रवारी दै. 'पुढारी'च्या मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांच्यासमवेत शैक्षणिकसह विविध विषयांवर त्यांनी चर्चा केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोरोनामुळे जगभरातील सगळी व्यवस्था बदलली असून याचा शैक्षणिक क्षेत्रावर परिणाम झाला आहे. ऑनलाईन शिक्षण देताना मोठ्या प्रमाणात अडचणी आहेत. दिवाळीनंतर शैक्षणिक सत्र सुरू करण्याबाबत विचार होण्याची शक्यता आहे. विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या परीक्षांना प्रारंभ झाला आहे. गेल्या तीन दिवसांत ऑनलाईन ४९ हजार व ऑफलाईनच्या २२ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.



**कोल्हापूर : दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांच्यासमवेत विविध शैक्षणिक विषयांवर चर्चा करताना शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. (छाया : पप्पू अत्तार)**

डॉ. जाधव म्हणाले, कोरोनाचा वृत्तपत्रासह इतर उद्योगांवर परिणाम झाला आहे. लहान-मोठे व्यवसाय अडचणीत आले आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी काही दिवस जाऊ द्यावे लागणार आहेत. यासाठी सर्वांना एकत्रितपणे प्रयत्न करावे लागणार आहेत.

### परीक्षेत अडचण आल्यास 'प्लॅन बी' तयार

राज्यातील इतर विद्यापीठांप्रमाणे परीक्षेवेळी गोंधळ उडालेला नाही. आगामी काळात परीक्षेवेळी अडचणी निर्माण झाल्यास विद्यापीठाचा 'प्लॅन बी' तयार असल्याचेही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

प्रारंभी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. याप्रसंगी डॉ. जाधव यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांचा निवडीबद्दल सत्कार केला व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.